Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

ISSUE No- (CCCXVI) 317

September -2021

National E-Conference on

## Socio-Religious and Political Movements in the Pre-independence Period and Today



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Executive-Editor
Dr. Nilima D. Deshmukh
Principal
Sahakar Maharshi Late Bhaskarrao
Shingne Arts College,
Khamgaon, Dist. Buldana

Executive-Editor
Dr. J. B. Devhade
Principal
Late Pushpadevi Patil Art's and Science
College, Risod, Dist.Washim

Editors
Dr.Shrihari pitale

Assist.prof.& HOD Department of History
Late Pushpadevi Patil Art's and Science
College Risod Dist.Washim

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
-

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, (CCCXVII ) 317
ISSN : 2278-9308 September, 2021

# INDEX



| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Women Pioneers Of India: Their Contribution Towardswomen Education In Social Reform Movement,19th& 20thcenturies Ce — Dr. Indira P | 1 |
| 2 | बुलडाणा जिल्ह्यातील सत्यशोधक जलसाकार शावजी रावजी पाटील : एक आढावा — डॉ. संतोष बनसोड | 5 |
| 3 | सत्यशोधक संपतराव भिवाजी शिंगणे — डॉ.किशोर मारोती वानखडे | 8 |
| 4 | महाराष्ट्रातील आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी कामगारांचे योगदान — प्रा.सुनिल मदन मनवर | 18 |
| 5 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक कार्य — प्रा. डॉ. एस.एन. तुरुकमाने | 23 |
| 6 | कर्मवीर अण्णांच्या वैचारिक वारसदार : प्राचार्या सुमतीबाई पाटील — डॉ.जाधव संतोष हनुमंत | 25 |
| 7 | स्वातंत्र्य संग्रामातील मातृभूमि वृत्तपत्राचे योगदान(सन १९३१ ते १९४७) — प्रा.डॉ.संतोष गोपाळकृष्ण कुळकर्णी | 31 |
| 8 | मातृभूमिच्या संपादिक प्रमिलाताई ओक यांच्या नेतृत्वातील चले जाव आंदोलन — प्रा.डॉ.भास्कर शा.वझिरे | 34 |
| 9 | सावित्रीबाई फुले यांचे शिक्षण विषयक कार्य: ऐतिहासिक चिंतन — प्रा.डॉ. संदिप व्ही. भुरले | 37 |
| 10 | स्वातंत्र्यपूर्व काळातील धार्मिक, सामाजिक व राजकिय चळवळी व सद्याची परिस्थिती — प्रा. दिवाकर कांबळे | 41 |
| 11 | भारतीय स्वर्तत्र्य लढयात स्त्रियाचे योगदान — डॉ.राजाराम पिंपळपल्ले | 49 |
| 12 | विधवांच्या उध्दारांसाठी ब्रिटीश काळातील चळवळी — डॉ.विजय रामदास तिरपुडे | 55 |
| 13 | महीला क्रांतीकारी कनकलता बरूआ यांचे भारतीय स्वातंत्र चळवळीतील योगदान — विनोद उखर्डा धर्माळ | 59 |
| 14 | स्वातंत्र्यपूर्व काळातील सामाजिक चळवळी आणि आज (डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक चळवळी) — प्रा. डॉ. आनंद के. भोयर | 62 |
| 15 | प्रांतिक कौन्सिलच्या खामगाव जळगाव खेडेविभाग मतदारसंघाची १९३७ची निवडणूक – एक विश्लेषण — डॉ श्याम प्रकाश देवकर | 67 |
| 16 | भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महिलांचे योगदान — प्रा. रेखा बडोदेकर | 71 |
| 17 | पुनर्विवाह चळवळीचा इतिहास — प्रा.डॉ. भाऊराव रामेश्वर तनपुरे | 76 |
| 18 | स्वातंत्रपूर्व लढयातील बाबूगेनू सैद याची कामगिरी — स्मिता समिर अंध्याल | 80 |
| 19 | स्त्री जातीचे उध्दारक : महर्शी कर्वे — डॉ.आर.यु.हिरे | 83 |

**B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal**
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, (CCCXVII ) 317
ISSN : 2278-9308
September, 2021

# कर्मवीर अण्णांच्या वैचारिक वारसदार : प्राचार्या सुमतीबाई पाटील

डॉ.जाधव संतोष हनुमंत
रयत शिक्षण संस्थेचे, कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मोखाडा,
जिल्हा – पालघर. 401604
ईमेल – san.jadhav33@gmail.com, मोबाईल – ९८५०५५८५७६

**प्रस्तावना –**

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत सामाजिक व शैक्षणिक चळवळीचे खूप मोठे योगदान आहे. या सामाजिक चळवळीचा एक महत्वपूर्ण पैलू म्हणजे स्त्रीमुक्ती व स्त्री सुधारणा चळवळ होय. हा सामाजिक सुधारणेचा एक अविभाज्य भाग होता. स्त्रियांवर लादली जाणारी बंधने, अनिष्ट प्रथा दूर करणे हा होता. त्यासाठीच महात्मा फुले यांनी समाजाचे प्रबोधन करण्यासाठी स्त्री – शिक्षणाचा पुरस्कार केला. त्यांनी पुणे येथे मुलींच्या शिक्षणासाठी पहिली शाळा इ.स. १८४८ साली भिडेवाड्यात सुरु केली. त्याकाळात धार्मिक रितीरिवाजांच पालन केले जात होते. बहुजनांना व स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवले जात होते. अशा परिस्थितीत महात्मा फुले यांनी उचलले पाऊल खूप धाडसाच होत. समाजातील सनातन वर्ग या कार्यास विरोध करत होता. समाज व्यवस्थेत स्त्रियांना दुय्यम स्थान होते. बहुजन व स्त्री अशा वंचित घटकाला त्याच्या न्याय्य हक्काची जाणीव करून देण्याचे कार्य महात्मा फुले यांनी केले.

समाज शिक्षणाची गरज पूर्ण करताना कुटुंब हे केंद्रीभूत ठेवले. कुटुंबातील स्त्री शिकली पाहिजे. असा महात्मा फुले यांचा दृष्टीकोन होता. एक स्त्री शिकले म्हणजे पूर्ण कुटुंब शिकेल आणि एक पुरुष शिकला ते शिक्षण त्याच्यापुरतेच मर्यादित राहील. हे महात्मा फुले यांनी जाणले होते. म्हणूनच समाजात स्त्री जीवनाला बंधने घालणाऱ्या अनिष्ट प्रथा व चालीरीती दूर केल्याशिवाय सुधारणा होणार नाही. म्हणून पुणे येथे मुलींची दुसरी शाळा १८४९ मध्ये सुरु केली. महात्मा फुले यांना सावित्रीबाई फुले यांनी मोलाची साथ दिली. समाजातील सनातनी व अज्ञानी लोकांकडून होणारा त्रास सहन करून मुलींना शिक्षण देण्याचे कार्य केले. त्यामुळे स्त्री – शिक्षणाचे महत्व समाजाला पटू लागले.

त्यातील एक उदाहरण म्हणजे रयत शिक्षण संस्थेतील माजी प्राचार्या सुमतीबाई चव्हाण – पाटील होय. त्यांनी शिक्षण क्षेत्रात नावलौकिक मिळविला. प्राथमिक शिक्षणापासून गुणवत्ता प्राप्त केली. पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेतल्यानंतर रयत शिक्षण संस्थेत शैक्षणिक क्षेत्रात प्राध्यापक म्हणून सेवेला प्रारंभ केला. प्राचार्य पदावर सेवा केली त्यावेळी कुशल व शिस्तप्रिय प्रशासक अशी ओळख निर्माण केली. त्यानंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सदस्य व अध्यक्षा या उच्च दर्जाच्या पदावरील त्यांची कारकीर्द उल्लेखनीय राहिली आहे. त्यांनी केलेले कार्य महत्वपूर्ण आहे.

सुमतीबाई पाटील यांनी स्वतःच्या आयुष्यभर रयत शिक्षण संस्थेच्या प्रगतीसाठी कष्ट घेतले. त्यांची गोरगरीब विद्यार्थ्यांविषयी असणारी तळमळ, अध्यापनातून विद्यार्थ्यांपर्यंत ज्ञान पोहोचविण्याची हातोटी, प्रशासक असताना निर्माण केलेली शिस्त, महाराष्ट्र लोकसेवा आयोगात सदस्य व अध्यक्षपदाची कारकीर्द, सामाजिक कार्य आणि विशेष म्हणजे आयुष्यभर निस्वार्थी भावनेने सदैव ज्ञानदानाच कार्य केले. पी.जी. सरांच्या प्रत्येक कार्यात साथ दिली. या दाम्पत्याने मृत्युपत्रात आयुष्यभर काटकसरीने जमवलेली पुंजी पुन्हा समाजालाच दान केली. अशा पद्धतीने रयत शिक्षण संस्था व कर्मवीर अण्णांच्या विचारांचे वारसदार म्हणून केलेले कार्य समाजासाठी मार्गदर्शक ठरेल.

**कौटुंबिक पार्श्वभूमी –**

सुमतीबाई पाटील यांच माहेरच कुटुंब उच्चशिक्षित व सुसंस्कृत होत. सुमतीबाई यांचे वडील हे त्याकाळातील कोल्हापुरातील सुप्रसिद्ध डॉक्टर होते. त्यांचे नाव डॉ.शं.ग.चव्हाण असे होते तर आईचे नाव सुशीलाबाई असे होते. या दाम्पत्याला तीन मुले होती. शं.ग.चव्हाण स्वतः डॉक्टर असल्यामुळे त्यांची जडणघडण शिस्तबद्धपणे झाली होती. त्यांनी आपल्या मुलांना जयसिंह चव्हाण, विजयसिंह चव्हाण आणि सर्वात धाकटी मुलगी सुमती यांच्यावर लहानपणापासून चांगले संस्कार केले. घरची आर्थिक स्थिती चांगली असूनही मुलांना काटकसरीने व योग्य तेथेच खर्च करण्याची सवय लावली. घरामध्ये अभ्यासाचं वातावरण होते त्यामुळे तिन्ही भावंड हुशार झाली.

शं.ग. चव्हाण यांना लोक 'आबा' या नावाने ओळखत होते. कोल्हापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त लोक सैन्यामध्ये भरती होत. आबासाहेबांचे शिक्षण पूर्ण झाल्यावर ते आर्मी मेडिकलमध्ये भरती झाले. तो काळ ब्रिटीश

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, (CCCXVII) 317
ISSN : 2278-9308 September, 2021

१९९८ पासून राहायला होता. घरकाम करणाऱ्या गंगुबाई, एम.जी.निकम व त्यांच्या पत्नी सुनीताबाई हे सर्वजण सुमतीबाईंची काळजी घेत होते. बॅ. पी.जी. सरांना जसे लोक भेटावयास येत तसेच मॅडम यानाही अनेकजण भेटण्यासाठी येत असत. प्राचार्य एम.एम.स्वामी. अॅड के.व्ही.पाटील इत्यादी अनेक या कुटुंबाशी निगडीत असणारी मंडळी भेटायला येत. सुमतीबाईंची प्रकृती लहानपणापासून नाजूक होती. आता वार्धक्यामुळे त्यांना अशक्तपणा जाणवू लागला होता. हॉस्पिटलमध्ये उपचार चालू होते. मात्र प्रकृती कमालीच्या अशक्तपणामुळे औषधालाही प्रतिसाद देत नव्हती. गुरुवार दिनांक ९ फेब्रुवारी २००५ रोजी सायंकाळी ९.०० वाजता आयुष्यभर दुसऱ्यांना ज्ञानप्रकाश देणारी समई विझली होती.

**सुमतीबाईंच्या कार्याचे मूल्यमापन :**

सुमतीबाई पाटील सुखवस्तू व सुसंस्कृत घरामध्ये लहानाच्या मोठ्या झाल्यामुळे त्या हुशार होत्या. प्राथमिक शिक्षणापासून ते महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण होईपर्यंत सुमतीबिनच नाव गुणवत्ता यादीत असायचं. अभ्यासात हुशार होत्या तशाच त्या क्रीडाक्षेत्रात मागे नव्हत्या. खो – खो, बॅडमिंटन, बुद्धिबळ अशा खेळात त्यांनी प्राविण्य मिळवलं होत. आज शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी त्या एक आदर्शच आहेत.

१९५२ मध्ये बॅ. पी. जी. पाटील यांच्याबरोबर विवाह झाला. लग्न जमवताना विषय, हुशारी व सुसंस्कृतपणा या गोष्टी महत्वाच्या ठरल्या होत्या. बॅ. पी. जी. सरांचे शिक्षक डॉ. गोकाक हे नंतर सुमतीबाईंच्या कॉलेजचे प्राचार्य झाले होते. कर्मवीर अण्णा व गोकाक सर यांनी सुमतीबाई व पी. जी. सर या आपल्या विद्यार्थी संसार व सामाजिक कार्य करतील हे भविष्य ओळखल होत कि काय असच वाटत. विवाहानंतर पी.जी. सर व सुमतीबाई एम.ए. झाले. शिवाजी कॉलेजमध्ये इंग्रजी स्पेशल स्तरावर सुरु झाले. सर व मॅडम दोघेही अध्यापनाचे काम करू लागले. नंतर छ. शिवाजी कॉलेजमध्ये एम.ए. चे वर्ग सुरु केले. फायदा असा झाला की, ग्रामीण भागात इंग्रजीच्या शिक्षकाची वाणवा होती ती कमी करण्यास मदत होऊ लागली.

सुमतीबाईंनी अध्यापनाबरोबर प्राचार्यपदाची जबाबदारी सांभाळली. प्रेमान तसेच शिस्तबद्धपणे प्रशासन चालवलं. पुढे त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सदस्य व अध्यक्षपदाची कारकीर्द यशस्वीपणे पार पाडली. बॅ.पी जी. सरांप्रमाणेच त्यांच्या कार्याचा भाग म्हणजे आर्थिक व सामाजिकदृष्ट्या असहाय्य असणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी जाणीपूर्वक सहकार्य केले. प्राचार्य, महाराष्ट्र लोकसेवा आयोग सदस्य, अध्यक्ष पदाच्या अधिकाराचा वापर गरीब व हुशार विद्यार्थ्यांसाठी केला.

सौ. सुमतीबाई या निश्चयी, संयमी, शिस्तप्रिय व कुशल प्राचार्य होत्या. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा कार्यकाल पारदर्शकपणे पार पाडला. अध्यापनात नीटनेटकेपणा व मुद्देसूदपणा नि जिव्हाळा . प्रशासक म्हणून असणारी शिस्त व प्रेम, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे काम करताना योग्य व न्याय्य भूमिका त्यांनी यशस्वी केल्या होत्या. त्याचं सौम्यिशतल व्यक्तिमत्व, जिव्हाळा व आपलेपणा असंख्य विद्यार्थ्यांसाठी वरदायी ठरला आहे. फारसा गाजावाजा न करता समर्पित भावनेने काम करत राहणे हा त्यांचा स्थायीभाव होता. बॅ. पी.जी सर व मॅडम यांनी संस्थेच्या ध्येय – धोरणानुसार केवळ पुस्तकी शिक्षण न देता जीवनशिक्षण व जीवनदृष्टी देण्याचे महान कार्य या दाम्पत्याने केले.

संदर्भ :

१)कीर धनंजय, महात्मा जोतीराव फुले, पॉप्युलर मुंबई, २०००.
२)कुलकर्णी अ.रा., महाराष्ट्र समाज आणि संस्कृती, डायमंड पुणे, २००८.
३)आठल्ये विभा, आधुनिक भारताचा इतिहास, अंशुल नागपूर, २००४.
४)डॉ. नलावडे विजय, रयतपुत्र बॅ. पी.जी. पाटील, सातारा,२००९.
५)माळी शिवराम (संपा.), 'उदयंती', (बॅ. पी.जी. पाटील व सौ. सुमतीबाई पाटील जीवन दर्शन,सातारा,१९८२.
६)कीर धनंजय, 'ज्योतिबा फुले' (आमच्या समाजक्रांतीचे जनक), पॉप्युलर प्रकाशन, बॉम्बे,१९६८.
७)रयत शिक्षण पत्रिका, १९७५, जोड अंक, संपादिका, प्राचार्या सौ.सुमतीबाई पांडुरंग पाटील.
८)दैनिक ऐक्य, गुरुवार दिनांक ३ जुलै, २००८.
९)दैनिक सकाळ, ३ जुलै २००३, २७ ऑगस्ट २००६, ९ मे २००७.